# बीएस्सी नर्सिंग, विधि अभ्यासक्रमासाठी अर्ज नोंदणी करण्यास मुदतवाढ; सीईटी कक्षाचा निर्णय

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

बीएस्सी नर्सिंग आणि विधि तीन आणि पाच वर्ष अभ्यासक्रमांच्या प्रवेश अर्ज नोंदणीसाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने पुन्हा मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार बीएस्सी नर्सिंग अभ्यासक्रमाला १० मार्चपर्यंत, तर विधि तीन वर्षे व पाच वर्ष अभ्यासक्रमांसाठी १७ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यामुळे अधिकाधिक विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमांसाठी अर्ज करण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे विविध व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा घेण्यात येते. डिसेंबरमध्ये परीक्षेचे संभाव्य वेळापत्रक जाहीर केल्यानंतर राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून अर्ज नोंदणी प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली. मार्चच्या अखेरच्या आठवड्यामध्ये विविध अभ्यासाक्रमांच्या प्रवेश परीक्षा होत आहेत. त्यामुळे काही अभ्यासक्रमांची अर्ज नोंदणी प्रक्रिया संपुष्टात आली, तर काही अभ्यासक्रमांची अर्ज नोंदणी प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. मात्र विधि तीन वर्ष व पाच वर्ष अभ्यासक्रमासाठी अर्ज नोंदणी करण्यास राज्य सामाईक परीक्षा कक्षाकडून मुदतवाढ देण्यात आली आहे. बीएस्सी नर्सिंग अभ्यासक्रमाच्या अर्ज नोंदणीसाठी २८ जानेवारी आणि २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. त्यानुसार २८ फेब्रुवारीपर्यंत सुमारे २७ हजार विद्यार्थ्यांनी अर्ज नोंदणी केली. मात्र अनेक विद्यार्थ्यांचे अर्ज अर्धवट स्थितीमध्ये किंवा अनेक विद्यार्थ्यांनी शुल्क भरलेले नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन बी.एस्सी नर्सिंग अभ्यासक्रमासाठी अर्ज नोंदणी करण्यास १० मार्चपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने घेतला आहे. राज्यामध्ये बीएस्सी नर्सिंग अभ्यासक्रमाच्या ११ हजार २८० जागा आहेत. गतवर्षी बीएस्सी नर्सिंग अभ्यासक्रमासाठी राज्यभरातून ५८ हजार ६६३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती.

# फेब्रुवारीचा हप्ता 8 मार्चच्या पूर्वसंध्येला मिळणार - आदिती तटकरे

## मार्चअखेरीस मार्चचाही हप्ता मिळणार

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत राज्यभरातील लाभार्थी महिलांना राज्य सरकारकडून दर महिन्याला १,५०० रुपये दिले जात आहेत. या महिलांना आता फेब्रुवारी महिन्याचा हप्ता कधी मिळणार असा प्रश्न पडला होता. दरम्यान, राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी या प्रश्नाचं उत्तर दिलं आहे. विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनानिमित्त तटकरे विधीमंडळात दाखल झाल्या होत्या. यावेळी त्यांनी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. वार्तहरांनी तटकरे यांना सर्वप्रथम लाडकी बहीण योजनेच्या फेब्रुवारी महिन्याच्या हप्त्याविषयी प्रश्न विचारल्यावर त्यांनी त्यावर मोठी घोषणा केली. तसेच त्यांनी सांगितलं की येत्या आठ मार्च रोजी जागतिक महिला दिनाचं औचित्य साधून विधीमंडळाचं विशेष सत्र होणार आयोजित करण्यात आलं आहे. आदिती तटकरे म्हणाल्या, "येत्या आठ मार्च रोजी



विधीमंडळाचं विशेष सत्र होणार आहे. त्या दिवशी शनिवार असूनही हे सत्र होणार. खास महिला लोकप्रतिनिधिंसाठी व राज्यातील महिलांसाठी हे सत्र असेल. याशिवाय राज्यातील जनतेची लाडकी योजना म्हणजेच 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'बाबतही महत्त्वाची माहिती जनतेला द्यायची आहे. लाडकी बहीण योजनेचा फेब्रुवारी महिन्याचा हप्ता येत्या आठ मार्च रोजी वितरीत केला जाणार आहे. महिला दिनाच्या पूर्वसंध्येला सर्व लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात लाडकी बहीण योजनेचा हप्ता जमा होईल. येत्या पाच ते सहा मार्चपर्यंत योजनेचा लाभ वितरित करण्याची प्रक्रिया सुरू होईल. येत्या आठ मार्च रोजी योजनेचे पैसे थेट महिलांच्या खात्यात उपलब्ध करून देणार आहोत. महिला दिनाचं औचित्य साधून आम्ही आठ मार्च रोजी गेल्या महिन्याचा हप्ता वितरित करत आहोत". दरवर्षी जगभरात ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचं औचित्य साधत राज्य सरकार लाडकी बहीण योजनेचा फेब्रुवारी महिन्याचा हप्ता वितरित करून महिला दिन साजरा करणार आहे.

राज्यात पात्र लाडक्या बहिणींची योजना बंद होणार नाही. लाडक्या बहिणी योजनेपासून वंचित राहणार नाही अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. राज्यात महायुतीचं सरकार आलं आहे आणि सरकार आता ती योजना बंद करेल अथवा या योजनेचे निकष कठोर करून पात्र महिलांची संख्या कमी करेल, असे दावे केले जात होते. मात्र उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं की ही योजना बंद होणार नाही.

# मुंबई विमानतळावर महिलेला अटक
## 11 कोटींचे ड्रग्ज पोटात ठेवून केला 14 हजार किमी प्रवास

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी मोठी कारवाई केली आहे. सीमाशुल्क विभागाच्या कारवाईत आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश करत एका ब्राझिलियन महिलेला अटक केली. या महिलेने कोकेनच्या १०० कॅप्सूल गिळल्या होत्या. या कॅप्सूलमध्ये एकूण १,०९६ ग्रॅम कोकेन होते ज्याची बाजारात किंमत १०.९६ कोटी रुपये आहे.

डायरेक्टरेट ऑफ रेव्हेन्यू इंटेलिजेंसला माहिती मिळाली होती की एक ब्राझिलियन महिला भारतात अंमली पदार्थांच्या तस्करीत सामील आहे. यानंतर अधिकाऱ्यांनी या महिलेला शोधून काढलं आणि तिची तपासणी केली तेव्हा हा सगळा प्रकार समोर आलं. महिलेला मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज विमानतळावर थांबवण्यात आले. ती ब्राझीलच्या साओ पाउलो येथून येथून आली होती. महिलेने चौकशीदरम्यान आपला गुन्हा कबूल केला. चौकशीत महिलेने भारतात ड्रग्जची तस्करी करण्यासाठी कॅप्सूल गिळल्याची कबुली दिली.

सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी महिलेला मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर ताब्यात घेतलं. तिच्याकडून पहिल्यांदा झडतीत काहीही संशयास्पद आढळले नाही. मात्र दाट संशय आल्याने अधिकाऱ्यांनी ब्राझिलियन महिलेची कसून चौकशी केली. त्यावेळी महिनेने कोकेनने भरलेल्या कॅप्सूल गिळल्याची कबुली दिली. महिलेच्या पोटात तब्बल कोकेनच्या १०० कॅप्सूल होत्या.

महिलेच्या जीवाला धोका असल्याचे पाहून तिला लगेचच शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आलं. डॉक्टरांच्या देखरेखीखाली महिलेच्या पोटातून १०० कॅप्सूल काळजीपूर्वक बाहेर काढण्यात आल्या. या कॅप्सूलमध्ये १.०९६ किलो कोकेन सापडले. एनडीपीएस कायद्यांतर्गत कोकेन जप्त करण्यात आले आणि त्यानंतर महिलेला अटक करण्यात आली. दरम्यान ही एक ड्रग्ज तस्करीची अतिशय धोकादायक पद्धत असून यामध्ये कॅप्सूल फुटल्यास एखाद्याचा मृत्यू देखील होऊ शकतो.

दुसरीकडे, गेल्या महिन्यात अशाच प्रकारे एक मोठी कारवाई करण्यात आली होती. एअर इंडिया आणि इंडिगोच्या दोन वेगवेगळया फ्लाइटमधून बँकॉककहून आलेल्या चार भारतीय प्रवाशांकडून सीमाशुक्ल विभागाच्या अधिकाऱ्यांनी १३,९२३ ग्रॅम हायड्रोपोनिक गांजा जप्त केला होता. या जप्त केलेल्या गांजाची आंतरराष्ट्रीय बाजारात किंमत अंदाजे १३.९२ कोटी रुपये आहे. एअर इंटेलिजन्स युनिटचे अधिकाऱ्यांना विमानतळावर दोन वेगवेगळया फ्लाइटमधून आलेल्या चार प्रवाशांच्या संशयास्पद हालचाली दिसल्या. अधिकाऱ्यांनी संशयावरून त्यांची चौकशी केली असता त्यांच्याकडून हायड्रोपोनिक गांजा जप्त करण्यात आला.

# साकीनाका येथे 30 वर्षाच्या तरूणाची हत्या

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

मोबाइल घेऊन पळून गेल्याच्या रागातून दोघांमध्ये झालेल्या हाणामारीत ३० वर्षीय तरूणाचा मृत्यू झाल्याची घटना साकीनाका परिसरात घडली. याप्रकरणी साकीनाका पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून आरोपी पिता-पुत्राला अटक केली. रस्त्यावर पाडून तरूणाला केलेल्या मारहाणीत त्याचा मृत्यू झाल्या असून पोलीस याप्रकरणी अधिक तपास करीत आहे.

अशोक अविनाश तुळसे (३०) असे मृत तरूणाचे नाव आहे. तो साकीनाका येथील अशोक नगर परिसरातील रहिवासी आहे. तक्रारीनुसार, अशोक तुळशे हा आरोपी सुरेश भगवान दुनघव यांचा मोबाइल घेऊन पळून गेला होता. त्यामुळे संतापलेल्या सुरेश व त्याचा मुलगा लक्ष्मण दुनघव यांनी त्याला साकीनाका येथील काजूपाडा परिसरात गाठला. त्यानंतर त्यांनी लाथा-बुक्क्यांनी अशोक तुळशेला मारहाण केली. त्यावेळी त्यांनी त्याला रस्त्यावर ढकलून दिले. त्यामुळे त्याच्या डोक्यावर गंभीर दुखापत झाली आणि अशोक बेशुद्ध झाला. स्थानिकांच्या मदतीने त्याला घाटकोपर येथील राजावाडी रुग्णालयात नेण्यात आले. त्यावेळी उपचारादरम्यान रविवारी त्याचा मृत्यू झाला. याप्रकणी मृत अशोक तुळशे याचा भाऊ आकाश तुळशे (२४) याने पोलिसांना घडलेल्या प्रकाराची माहिती दिली. त्याच्या तक्रारीवरून साकीनाका पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१), ३ (५) अंतर्गत पिता-पुत्र सुरेश व लक्ष्मणविरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला. सुरेशचा मोबाइल घेऊन पळून गेल्याच्या रागातून सुरेश व त्याचा मुलगा लक्ष्मण याने अशोकला मारहाण केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी विशेष पथक स्थापन करून आरोपींचा शोध घेतला. त्या दोघांनाही अशोक नगर परिसरातून अटक करण्यात आली.

दोन्ही आरोपी व मृत व्यक्ती तिघेही साकीनाका येथील अशोक नगर परिसरातील रहिवासी आहेत. अशोक शनिवारी सुरेशचा मोबाइल घेऊन पळून गेला होता.

# सर्व आगारांतील बस 15 एप्रिलपर्यंत भंगारात!

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

पुणे येथील स्वारगेट स्थानकातील घटनेच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने आणलेल्या स्क्रॅप पॉलिसीनुसार ज्या बस स्क्रॅप करण्याची गरज आहे, त्या राज्यातील सर्व आगारातील बस येत्या १५ एप्रिलपर्यंत स्क्रॅप करणार असल्याचे परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सांगितले.

पुण्यातील घटनेच्या निमित्ताने महिलांची सुरक्षा ऐरणीवर आली आहे. या अनुषंगाने शनिवारच्या बैठकीत त्याचा विस्तृत आढावा घेण्यात आला. माधुरी मिसाळ यांनी सांगितले, की एसटीमध्ये पूर्वीसारखे सुरक्षा दक्षता अधिकारी नव्याने नेमण्यात येतील. पोलिसांची गस्त वाढविण्यात येणार आहे. स्वारगेट स्थानकात यापूर्वी सीसीटीव्ही बसविण्यात आले आहेत. त्यांची संख्यादेखील आता वाढविण्यात येईल. महिला सुरक्षेच्या दृष्टीने ज्या काही उपाययोजना करण्याची गरज आहे, त्या तत्काळ करणार असल्याचे सांगताना



या प्रकरणाच्या ऑडिटमध्ये जे कोणी अधिकारी किंवा ठेकेदार दोषी असतील त्यांच्यावर कठोर कारवाई करणार असल्याचे मिसाळ यांनी सांगितले.

### घुसखोरी रोखण्याचे निर्देश

राज्यातील सर्व एसटी बसस्थानकाच्या आवारात तक्रार निवारण कक्ष, तक्रार नोंदवण्यासाठी एक टोल फ्री क्रमांक राज्यात दिला जाईल. खासगी बसचालकांची एसटी स्थानकात होणारी घुसखोरी रोखण्यासाठीदेखील उपाययोजना आखण्याचे निर्देश दिल्याचे राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सांगितले.

# रोहित पवार शरद पवार गटात नाराज?

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसशरद पवार गटातील नेते आणि आमदार रोहित पवार त्यांच्या पक्षात नाराज असल्याची चर्चा आहे. अलीकडेच छावा सिनेमाच्या बाबतीत रोहित पवारांनी केलेले ट्विट चर्चेत आले. त्यात रोहित पवारांनी अप्रत्यक्षपणे आजच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य करत जवळच्या माणसांकडून सावध राहण्याची गरज असते, त्याचा धडा यातून मिळाला असं ट्विट केले. रोहित पवारांच्या या ट्विटने त्यांचा रोख कुणाकडे असा सवाल उपस्थित झाला. त्यानंतर आज अधिवेशनासाठी आलेल्या रोहित पवारांना पत्रकारांनी प्रश्न विचारला. त्यावेळी त्यांनी दिलेले उत्तर ऐकून ते पक्षात नाराज आहेत का अशीच चर्चा सुरू झाली आहे.

रोहित पवार म्हणाले की, गेली ७ वर्ष पक्षासाठी लढल्यानंतर कुठेतरी आम्ही कमी पडत असल्याचं काही नेत्यांना वाटत असल्याने कदाचित त्यांनी निर्णय घेतला असेल. एक आमदार म्हणून पक्षाचा पाठिंबा असला काय किंवा नसला काय सामान्य लोकांच्या हितासाठी आजपर्यंत मी लढत आलो आहे. पक्षाचा पाठिंबा कायम राहिला असून विशेषत: शरद पवारांचा पाठिंबा माझ्यासारख्याला आणि इतरही कार्यकर्त्याला राहिलेला आहे. तेवढाच पाठिंबा माझ्यासाठी खूप काही आहे असं त्यांनी सांगितले.

तसेच मी व्यक्तिगत टिप्पणी करणार नाही, परंतु मीच नव्हे तर अख्खा महाराष्ट्र या सरकारवर नाराज आहे. विरोधी पक्षावरही जनता नाराज आहे. सरकार लोकांचे प्रश्न सोडवत नाही म्हणून नाराज आहे आणि विरोधी पक्ष लोकांचा आवाज बनून सरकारविरोधात लढत नाही म्हणून जनता नाराज आहे. मी विरोधी पक्षातील सर्व नेत्यांना विनंती करतोय, अनेक अनुभवी नेते, मंत्री राहिलेले नेते आमच्याकडे आहेत. परंतु आज लोकांच्या बाजूने बोलताना खूप कमी नेते दिसतात. आज लढण्याचे दिवस आहेत, शांत बसण्याचे नाहीत. महाराष्ट्र नाराज आहे त्यात मीही नाराज आहे असं बोलायला हरकत नाही असं सांगत रोहित पवारांनी पक्षातील नाराजीच्या प्रश्नावर पत्रकारांना थेट उत्तर देणं टाळलं.

अलीकडेच राष्ट्रवादी शरद पवार गटाची महत्त्वाची बैठक पार पडली. त्यात अनेक नेत्यांना पदांची आणि नवी जबाबदारी देण्यात आली. मात्र त्यात रोहित पवार दिसले नाहीत असा प्रश्न पत्रकारांनी त्यांना विचारला. त्यावर मी आजारी असल्याने त्या बैठकीला मला जाता आला नाही. त्या बैठकीत काय चर्चा झाली हे सांगता येणार नाही. मात्र अजूनपर्यंत कुठलीही जबाबदारी माझ्यापर्यंत आली नाही किंवा मला जबाबदारी दिल्याचे कळाले नाही. जबाबदारी दिली नाही म्हणून नाराज आहे असा विषय नाही. खऱ्या अर्थाने लढण्याचे दिवस आहे. लढलं पाहिजे. ७ वर्ष पक्षासाठी लढत असताना कुठेतरी आम्ही कमी पडत असू असं काही नेत्यांना वाटत असेल अशी नाराजी रोहित पवारांनी अप्रत्यक्षपणे बोलून दाखवली.


**ANAND RATHI** आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
एक्सप्रेस झोन, ए विंग, ८वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (ई), मुंबई – ४०००६३ भारत
मोबाईल: +91-8451942710 वेबसाइट:www.rathi.com

**ई-लिलाव विक्री सूचना**

याद्वारे सामान्यत: जनतेला आणि विशेषतः खालील कर्जदार/जामीनदारांना नोटीस देण्यात आली आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) सोबत सुरक्षित आहे, ज्याचा ताबा देण्यात आला आहे एआरजीएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतलेले, ऑनलाइन ई–लिलावाद्वारे **https://sarfaesi. auctiontiger.net** वेबसाइटद्वारे शेड्यूलमध्ये नमूद केलेल्या तारखेला 'जसे आहे तेथे' आणि 'जसे आहे तसे' आणि 'जे काही आहे ते' आधारावर खाली नमूद केल्याप्रमाणे कर्जदार/जामीनदारांकडून वसुलीच्या तारखेपर्यंत शेड्यूलमध्ये विशेषत: नमूद केलेल्या एकूण रकमेच्या व त्यावरील कराराचे व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क वसुलीसाठी विकले जाईल.

कर्जदाराचे नाव: एम/एस श्री व्यंकटा पद्मावती सोल्युशन्स प्लॉट क्रमांक १० एफएफ, सी. –३०८३ बिमा कॉम्प्लेक्स, केडब्ल्यूसी कळंबोली सेक्टर केडब्ल्यूसी समोर. फायर ब्रिगेड, नवी मुंबई: ४१०२१८

सह–कर्जदाराचे नाव: (१) एम/एस पद्मावत प्रोटेक्टिव्ह सर्व्हिसेस, सी–३०८३ बिमा कॉम्प्लेक्स, केडब्ल्यूसी कळंबोली सेक्टर केडब्ल्यूसी समोर अग्निशमन दल, नवी मुंबई: ४१०२१८. (२) सौ. पदामवती चिचल्ला, फ्लॅट नं. एफ–३०१ तिसरा मजला, साई स्वार सीएचएसएल, भूखंड क्रमांक २०, सेक्टर २, खारघर, नवी मुंबई: ४१०२१०. (३) श्री. चंद्रशेखर चिचल्ला फ्लॅट नं.३०१ तिसरा मजला, साई स्वार सीएचएसएल, प्लॉट क्रमांक २०, सेक्टर २, खारघर, नवी मुंबई: ४१०२१०

मालमत्तेचा पत्ता: (१) फ्लॅट क्रमांक ३०१, तिसऱ्या मजल्यावर, एफ विंग, साई स्वार को–ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. मध्ये, भूखंड क्रमांक २०, सेक्टर २, खारघर, नवी मुंबई, ता: पनवेल, जिल्हा: रायगड, ४१०२१०. (२) कार्यालय क्रमांक ३०८३ ३ऱ्या मजल्यावर, सी विंग, बिमा ऑफिस परिसर सहकारी गृहनिर्माण संस्था लि. मध्ये, प्लॉट क्रमांक ११९, स्टील मार्केट, सेक्टर केडब्ल्यूसी, कळंबोली, नवी मुंबई, ता: पनवेल, जिल्हा: रायगड, ४१०२१८.

| | |
|---|---|
| थकबाकीची रक्कम (भावी व्याज आणि खर्चासह मागणी सूचनेनुसार) | रु.१,१३,२७,०७७/– (रुपये एक कोटी तेरा लाख सत्तावीस हजार सत्त्यात्तर फक्त) |
| लिलावाची तारीख | ३ एप्रिल २०२५ |
| राखीव किंमत | रु. १,१०,५२,९००/– (रुपये एक कोटी दहा लाख बावन्न हजार नऊशे फक्त) |
| बयाणा पैसे ठेव | राखीव किंमतीच्या १०% |
| किमान बोली वाढीची रक्कम | रु.२५,०००/– |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेची तपासणी करण्याची तारीख आणि वेळ | २६ मार्च २०२५ सकाळी १० ते दुपारी ४ वा |
| केवायसी दस्तऐवज/ईएमडीचा पुरावा इत्यादीसह निविदा फॉर्म सबमिट करण्याची तारीख आणि वेळ. | ३१ मार्च २०२५ दुपारी ४.०० पर्यंत केवायसी कागदपत्रांसह |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | ३ एप्रिल २०२५ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० दरम्यान |

टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार लिलावाच्या कार्यवाहीसंबंधी तपशीलवार अटी व शर्तींसाठी आनंद राठी ग्रुपच्या www.rathi.com वेबसाइटला भेट देऊ शकतात.

हे प्रकाशन नियम ९(१) किंवा सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/जामीनदारांना दिलेली ३० दिवसांची नोटीस देखील आहे.

तारीख: ०३ मार्च २०२५
ठिकाण: मुंबई
एसडी/– आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
अधिकृत स्वाक्षरी


# एका दिवसात 202 विनातिकीट प्रवाशांना पकडण्याचा विक्रम

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेवरून विनातिकीट प्रवाशांची संख्या वाढत असून या प्रवाशांची धरपकड सुरू आहे. त्यासाठी विविध तिकीट तपासणी मोहिमा राबविण्यात येत आहेत. मध्य रेल्वेच्या महिला तिकीट तपासनीस रुबिना अकिब इनामदार यांनी अलिकडेच एका दिवसात १५० विनातिकीट प्रवाशांना पकडून ४५ हजार ७०५ रुपये दंड वसूल करून विक्रमी कामगिरी केली होती. मात्र त्यानंतर अवघ्या चार दिवसांतच महिला तिकीट तपासनीस सुधा द्विवेदी यांनी एकाच दिवसात २०२ विनातिकीट प्रवाशांना पकडून ५५ हजार २१० रुपये दंड वसूल करून नवा विक्रम केला.

मध्य रेल्वेच्या मुंबई विभागात दररोज १,८१० लोकल सेवा धावतात. या लोकलमधून सुमारे ३९ लाख प्रवासी प्रवास करतात. तसेच मध्य रेल्वेवरून दररोज ६६ वातानुकूलित लोकल धावतात. यामधून दररोज सुमारे ७६ हजार ८३६ प्रवासी प्रवास करतात. परंतु, अनेक प्रवासी वातानुकूलित लोकलमधून विनातिकीट प्रवास करतात. तर, काही प्रवासी सामान्य लोकलच्या प्रथम अथवा द्वितीय श्रेणीचे तिकीट घेऊन वातानुकूलित लोकलमधून प्रवास करतात. अशा प्रवाशांमुळे तिकीटधारक प्रवाशांचा प्रवास गैरसोयीचा होतो. विनातिकीट प्रवाशांचा शोध घेऊन, त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. मध्य रेल्वेच्या मुंबई विभागातील लोकलमधून विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांना रोखण्यासाठी, तिकीटधारक प्रवाशांना सुरक्षित आणि आरामदायक प्रवास करता यावा यासाठी वारंवार तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. विशेषत: वातानुकूलित लोकल आणि स्थानकांवर तिकीट तपासणी मोहिमा राबवून चालू आर्थिक वर्षात जानेवारी २०२५ पर्यंत ८१ हजार ७०९ विनातिकीट प्रवाशांची धरपकड करण्यात आली. त्यांच्याकडून २ कोटी ७० लाख रुपये दंड वसूल करण्यात आला. मध्य रेल्वेच्या मुंबई विभागात २८ फेब्रुवारी २०२५ रोजी या एका दिवसात सर्वाधिक दंड वसूल करण्यात प्रवासी तिकीट निरीक्षक सुधा द्विवेदी यांना यश आले. त्यांनी एकाच दिवसात २०२ विनातिकीट प्रवाशांची धरपकड करून ५५ हजार २१० रुपये दंड वसूल करून नवा विक्रम नोंदविला. तेजस्विनी पथक २ च्या प्रवासी तिकीट निरीक्षक रुबिना अकिब इनामदार यांनी याआधी २४ फेब्रुवारी २०२५ रोजी एकाच दिवसात १५० विनातिकीट प्रवाशांना पकडून ४५ हजार ७०५ रुपये दंड वसूल करून विक्रमी कामगिरी केली होती. सुधा द्विवेदी यांनी २८ फेब्रुवारी रोजी नवा विक्रम केला, अशी माहिती मध्य रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

प्रवासी तिकीट निरीक्षक सुधा द्विवेदी यांची २२ मे १९९३ रोजी रेल्वेमध्ये नियुक्ती झाली. सुरुवातीला विद्युत विभागात नियुक्तीनंतर उद्घोषक म्हणून त्यांनी काम केले.

# नाट्यप्रेमींसाठी सुवर्णसंधी

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

बृहन्मुंबई महानगरपालिका, क्रीडा भवन प्रस्तुत मैकबेथ या नाटकाचा प्रयोग मंगळवार ४ मार्च रोजी सायंकाळी ४ वाजता अण्णाभाऊ साठे सभागृह, भायखळा येथे आयोजित करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे बुधवार ५ मार्च रोजी सायंकाळी ७वाजता साहित्य संघ, गिरगावच्या सभागृहात या नाटकाचा प्रयोग होणर आहे. लेखक आर. एल. तुली व अशोक ग्रोव्हर तसेच अरुण कदम यांनी दिग्दर्शीत केलेल्या एक अजरामर शेक्सपियरियन कलाकृती थेट रंगमंचावर सादर केली जाणार आहे. तिकीट व अधिक माहितीसाठी विद्याधर नामपल्ली (८८२८५४३६९९) यांचेशी संपर्क साधता येईल रंगभूमीप्रेमींनी चुकवू नये अशी अनोखी संधी असून, मुंबईकरांनी या संधीचा लाभघ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.


**ANAND RATHI** आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
एक्सप्रेस झोन, ए विंग, ८वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (ई), मुंबई – ४०००६३ भारत
मोबाईल: +91-8451942710 वेबसाइट:www.rathi.com

**ई-लिलाव विक्री सूचना**

याद्वारे सामान्यत: जनतेला आणि विशेषतः खालील कर्जदार/जामीनदारांना नोटीस देण्यात आली आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) सोबत सुरक्षित आहे, ज्याचा ताबा देण्यात आला आहे एआरजीएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतलेले, ऑनलाइन ई–लिलावाद्वारे **https://sarfaesi. auctiontiger.net** वेबसाइटद्वारे शेड्यूलमध्ये नमूद केलेल्या तारखेला 'जसे आहे तेथे' आणि 'जसे आहे तसे' आणि 'जे काही आहे ते' आधारावर खाली नमूद केल्याप्रमाणे कर्जदार/जामीनदारांकडून वसुलीच्या तारखेपर्यंत शेड्यूलमध्ये विशेषत: नमूद केलेल्या एकूण रकमेच्या व त्यावरील कराराचे व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क वसुलीसाठी विकले जाईल.

कर्जदाराचे नाव: श्री. रजनीश प्रभाकर फाले १सी, विलो हाउस, ईडन वुड्स, ग्लॅडिस अल्वारीस रोड, वसंत विहार, ठाणे पश्चिम, मुंबई: ४००६१०

सहकर्जदाराचे नाव: (२) श्रीमती कुसुम रजनीश फाले १सी, विलो हाउस, ईडन वुड्स, ग्लॅडिस अल्वारीस रोड, वसंत विहार, ठाणे पश्चिम, मुंबई: ४०० ६१०.

मालमत्तेची माहितीः फ्लॅट नं.१सी, पहिला मजला, विलो हाऊस, ईडन वुड्स सीएचएसएल, खेवरा सर्कल, ठाणे (पश्चिम), ताल आणि जिल्हा ठाणे: ४०० ६१०

| | |
|---|---|
| थकबाकीची रक्कम (भावी व्याज आणि खर्चासह मागणी सूचनेनुसार) | रु. ५१,९४,०७८/– (रुपये एक्कावन लाख चौरयान्नाव हजार अठ्ठावन्न फक्त) |
| लिलावाची तारीख | ३ एप्रिल २०२५ |
| राखीव किंमत | रु. १,०६,४७,०००/– (रुपये एक कोटी सहा लाख सत्तेचाळीस हजार फक्त) |
| बयाणा पैसे ठेव | राखीव किंमतीच्या १०% |
| किमान बोली वाढीची रक्कम | रु.२५,०००/– |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेची तपासणी करण्याची तारीख आणि वेळ | २६ मार्च २०२५ सकाळी १० ते दुपारी ४ वा |
| केवायसी दस्तऐवज/ईएमडीचा पुरावा इत्यादीसह निविदा फॉर्म सबमिट करण्याची तारीख आणि वेळ. | ३१ मार्च २०२५ दुपारी ४.०० पर्यंत केवायसी कागदपत्रांसह |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | ३ एप्रिल २०२५ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० दरम्यान |

टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार लिलावाच्या कार्यवाहीसंबंधी तपशीलवार अटी व शर्तींसाठी आनंद राठी ग्रुपच्या www.rathi.com वेबसाइटला भेट देऊ शकतात.

हे प्रकाशन नियम ९(१) किंवा सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/जामीनदारांना दिलेली ३० दिवसांची नोटीस देखील आहे.

तारीख: ०३ मार्च २०२५
ठिकाण: मुंबई
एसडी/– आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
अधिकृत स्वाक्षरी



**ANAND RATHI** आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
एक्सप्रेस झोन, ए विंग, ८वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (ई), मुंबई – ४०००६३ भारत
मोबाईल: +91-8451942710 वेबसाइट:www.rathi.com

**ई-लिलाव विक्री सूचना**

याद्वारे सामान्यत: जनतेला आणि विशेषतः खालील कर्जदार/जामीनदारांना नोटीस देण्यात आली आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) सोबत सुरक्षित आहे, ज्याचा ताबा देण्यात आला आहे एआरजीएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतलेले, ऑनलाइन ई–लिलावाद्वारे **https://sarfaesi. auctiontiger.net** वेबसाइटद्वारे शेड्यूलमध्ये नमूद केलेल्या तारखेला 'जसे आहे तेथे' आणि 'जसे आहे तसे' आणि 'जे काही आहे ते' आधारावर खाली नमूद केल्याप्रमाणे कर्जदार/जामीनदारांकडून वसुलीच्या तारखेपर्यंत शेड्यूलमध्ये विशेषत: नमूद केलेल्या एकूण रकमेच्या व त्यावरील कराराचे व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क वसुलीसाठी विकले जाईल.

कर्जदाराचे नाव: एम/एस चिश्तिया फॅशन (कर्जदार) खोली क्रमांक ००४, साई आनंद सीएचएस ९, बी१, संघर्ष नगर, चांदिवली, मुंबई: ४०००७२.

सह–कर्जदाराचे नाव: (१) श्री. मोहम्मद माजिद शेख (सह–कर्जदार) फ्लॅट क्र. ६०२, ६ वा मजला, सी विंग, इमारत क्र. ४, पंचरत्न सीएचएसएल, दामोदर पार्क, घाटकोपर (प) मुंबई: ४०००८६. महाराष्ट्र. (२) एम.एस शमीम माजिद शेख (सह–कर्जदार) फ्लॅट क्र. ६०२, ६ वा मजला, सी विंग, इमारत क्र. ४, पंचरत्न सीएचएसएल, दामोदर पार्क, घाटकोपर (प) मुंबई: ४०००८६. महाराष्ट्र.

मालमत्तेचा पत्ता: फ्लॅट क्र. ६०२, सहावा मजला, सी विंग, बिल्डिंग क्र. ४, पंचरत्न सीएचएसएल, दामोदर पार्क, दामोदर पार्क रोड, सीटीएस क्र. १५० गाव घाटकोपर, घाटकोपर पश्चिम, मुंबई: ४०००८६. महाराष्ट्र भारत.

| | |
|---|---|
| थकबाकीची रक्कम (भावी व्याज आणि खर्चासह मागणी सूचनेनुसार) | रु. ६३,७६,१५२/– (रुपये त्रेसष्ठ लाख त्रेहात्तर हजार एकशे बावन्न फक्त) |
| लिलावाची तारीख | ३ एप्रिल २०२५ |
| राखीव किंमत | रु. ९८,६८,३२०/– (रुपये अठ्ठ्यान्नाव लाख अडूसष्ठ हजार तीनशे वीस फक्त) |
| बयाणा पैसे ठेव | राखीव किंमतीच्या १०% |
| किमान बोली वाढीची रक्कम | रु.२५,०००/– |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेची तपासणी करण्याची तारीख आणि वेळ | २६ मार्च २०२५ सकाळी १० ते दुपारी ४ वा |
| केवायसी दस्तऐवज/ईएमडीचा पुरावा इत्यादीसह निविदा फॉर्म सबमिट करण्याची तारीख आणि वेळ. | ३१ मार्च २०२५ दुपारी ४.०० पर्यंत केवायसी कागदपत्रांसह |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | ३ एप्रिल २०२५ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० दरम्यान |

टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार लिलावाच्या कार्यवाहीसंबंधी तपशीलवार अटी व शर्तींसाठी आनंद राठी ग्रुपच्या www.rathi.com वेबसाइटला भेट देऊ शकतात.

हे प्रकाशन नियम ९(१) किंवा सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/जामीनदारांना दिलेली ३० दिवसांची नोटीस देखील आहे.

तारीख: ०३ मार्च २०२५
ठिकाण: मुंबई
एसडी/– आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
अधिकृत स्वाक्षरी



**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, गणपत जाधव मार्ग,**
**वरळी, मुंबई - ४०० ०१८.**

| | |
|---|---|
| Email: centralmumbai.ee@mahapwd.gov.in | ४९३६४०४/२४९३९९०२ फॅक्स २४९३१९०२ |
| जा.क्र.का.अ./ममुंवि/ई-निविदा/ ९८६ | दिनांक :- २७/०२/२०२५ |

**ई निविदा सूचना क्रमांक २२ सन (२०२४-२५)**

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक २४९३१९०२/२४९३६४०४ सदर कामासाठी असलेल्या निविदा अटी व शर्ती प्रमाणे पात्रता प्राप्त अनुभवी कंत्राटदाराकडून "बी-१" नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम (कोटीमध्ये) |
|---|---|---|
| १ | म.आ. पोदार रुग्णालय, वरळी, मुंबई येथील विशेष पंचकर्म विभागाचे अधुनिक पध्दतीने नुतनीकरण करणे. | ५.१५ |

| | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | दिनांक ०४/०३/२०२५ रोजी १५.०० वाजता ते दिनांक ११/०३/२०२५ रोजी १५.०० पर्यंत |
| ई-निविदा पुर्व बैठक | दिनांक ०७/०३/२०२५ रोजी दुपारी १५.०० वाजता (मुख्य अभियंता, मुंबई (सा.बां.) प्रादेशिक विभाग, मुंबई ४ था मजला, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई यांच्या दालनात) |
| ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) | दिनांक १२/०३/२०२५ रोजी १५.०० वाजता (अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां) मंडळ विभाग, यांचे कार्यालय, ५ वा मजला, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई) |

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
१.. http://mahapwd.gov.in
2. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल.)
3. कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयातील सूचना फलक.

डी.जी.आय.पी.आर.आरओसी २०२४-२५/क्र-५/C६८१२

कार्यकारी अभियंता,
मध्य मुंबई (सा.बां.) विभाग,
वरळी, मुंबई.